गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन पॅकेजच्या शीघ्र वाटप, सर्वेक्षण व अंमलबजावणीसाठी स्थापित विशेष कक्षांतर्गत पुनर्वसन आस्थापनेवरील निर्माण करण्यात आलेल्या ६४ पदांना दि१.३.२०१९ पासून दिनांक ३०.९.२०१९. पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१७/प्र.क्र.१०२ /र-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय,मुंबई-४०००३२

दिनांक: ५ मार्च २०१९

पहावे:-

१) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक: आरपीए-१२१०/प्र.क्र.६९/र-१,दि.१८.६.२०१३

२) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक: आरपीए-१०१३/प्र.क्र.९४/र-१,दि.१९.६.२०१३

३) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक: आरपीए-१०१५/प्र.क्र.७८/र-१,दि.२९.४.२०१५

४) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक: आरपीए-२०१७/प्र.क्र.१०२/र-१,दि.१७.१०.२०१७

५) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक गोप्रविक/पदांना मुदतवाढ/कावि-१५८/१७, दि.१३.१२.२०१७

७) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दि.८.१.२०१८

८) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक: आरपीए-२०१७/प्र.क्र.८४/र-१,दि.१८.१.२०१८

९) शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१७/प्र.क्र.१०२ /र-१ दि. १६/३/२०१८

१०) शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१७/प्र.क्र.१०२ /र-१ दि. २५/६/२०१८

११) शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१७/प्र.क्र.१०२ /र-१ दि. २९/९/२०१८

१२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक गोप्रविक/पदांना मुदतवाढ/कावि-१४/१९, दि.१२/२/२०१९

१३) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दि.२१.२.२०१९

शासन निर्णय: -

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांना मंजूर विशेष आर्थिक पॅकेजचे शीघ्र वाटप, सर्वेक्षण व अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कक्षांतर्गत पुनर्वसन आस्थापनेवरील निर्माण करण्यात आलेल्या गोसीखुर्द विशेष कक्षातील एकूण ९९ पदांपैकी ६४ अतिरिक्त पदांना दि. २९/९/२०१८ अन्वये दि.१.१०.२०१८ ते २९.२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. गोसीखुर्द प्रकल्पाचे विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत अनुदान वाटपाचे व पुनर्वसनाचे काम नागपूर व भंडारा जिल्हयात सुरु असून पॅकेज वाटप व पुनर्वसनाचे काम अदयाप शिल्लक आहे. सदर शिल्लक राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी नागपूर व भंडारा जिल्हयातील आस्थापनेवरील पदांच्या आवश्यकतेनुसार गोसीखुर्द विशेष कक्षातील अतिरिक्त एकूण ९९ पदांपैकी खाली दर्शविलेल्या तक्यात नमूद केल्यानुसार एकूण ६४ पदांना दिनांक १.०३.२०१९ ते दि.३०.९.२०१९ पर्यंत **(७ महिने) मुदतवाढ** या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

प्रपत्र

अ.क्र.	विभाग	कर्मचारी वृध्दांची पदांची नावे	पदांची वेतनश्रेणी (असुधारित)	पदांची संख्या
		विभागीय आयुक्त स्तरीय कर्मचारीवृंध्द		
१	**आयुक्त, नागपूर विभाग**	उपआयुक्त गोसीखुर्द अप्पर (जिल्हाधिकारी श्रेणी	रु.१५६००-७६०० जी.पी.३९१००	१
		नगररचनाकार	रु.३४८००-९३०० जी.पी.५४००	१
		कनिष्ठ अभियंता	रु.३४८००-९३०० जी.पी.४३००	१
		लेखापाल	रु.३४८००-९३०० जी.पी.४२००	१
		अव्वल कारकून	रु.३४८००-९३०० जी.पी.३५००	१
		ग्रामसेवक	कंत्राटी पध्दतीने	१
		डाटा एन्ट्री ऑपरेटर	कंत्राटी पध्दतीने	२
		शिपाई	कंत्राटी पध्दतीने	२
			एकूण	**१०**
	जिल्हास्तरीय कर्मचारीवृंद			
२	**जिल्हाधिकारी कार्यालय,नागपूर**	उपजिल्हाधिकारी	रु.३९१००-१५६०० जी.पी.५४००	१
		नायब तहसिलदार	रु.३४८००-९३०० जी.पी.४३००	१
		अव्वल कारकून	रु.३४८००-९३०० जी.पी.३५००	४
		लेखापाल	रु.३४८००-९३०० जी.पी.४२००	३
		कनिष्ठ लिपिक	रु.२०२००-५२०० जी.पी.१९००	२
		मंडळ अधिकारी	**प्रतिनियुक्तीने**	**३**
		ग्रामसेवक	कंत्राटी पध्दतीने	१
		डाटा एन्ट्री ऑपरेटर	कंत्राटी पध्दतीने	५
		शिपाई	कंत्राटी पध्दतीने	५
		एकूण		**२५**
३.	**जिल्हाधिकारी कार्यालय,भंडारा**	उपजिल्हाधिकारी	रु.३९१००-१५६०० जी.पी.५४००	१
		लेखाधिकारी	.रु ३४८००-९३०० जी.पी.४४००	१
		नायब तहसिलदार	रु.३४८००-९३०० जी.पी.४३००	१
		अव्वल कारकून	रु.३४८००-९३०० जी.पी.३५००	४
		लेखापाल	रु.३४८००-९३०० जी.पी.४२००	३
		कनिष्ठ लिपिक	रु.२०२००-५२०० जी.पी.१९००	४
		मंडळ अधिकारी	**प्रतिनियुक्तीने**	**४**
		ग्रामसेवक	कंत्राटी पध्दतीने	१
		डाटा एन्ट्री ऑपरेटर	कंत्राटी पध्दतीने	४
		शिपाई	कंत्राटी पध्दतीने	६
		एकूण		**२९**
			एकूण	**६४**

३. प्रशासकीय खर्चाकरिता रु. २३.५२ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी दिनांक ३१/०१/२०१९ पर्यंत रु.१३.४२/-कोटी इतकी रक्कम स्वीय प्रपंजी खात्यातून आहरीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे उपरोक्त ६४ पदांचा खर्च हा अतिरिक्त पदांवरील वेतन व भत्ताचा खर्च तसेच इतर कार्यालयीन खर्च हा मंजूर प्रशासकीय खर्चातून भागविण्यात येईल त्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता भासणार नाही.

४. गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधितांच्या पुनर्वसन कार्यक्रमावर होणाऱ्या खर्चाची विभागणी संबंधित जिल्हाधिकारी यांनी गोसीखुर्द प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांशी विचारविनियम करुन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे खर्चाचे आवश्यक तो ताळमेळ घालून जुळवाजुळव करावी व सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचा खर्च समायोजित करावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२,दिनांक १७.४.२०१५ नुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग तीन मधील अ.क्र.४ चा परिच्छेद २७ (२) (क) अन्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क,दिनांक २१ फेब्रुवारी,२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०५१११८१५२८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0dbd15a4cda43063e726a7e4b0f36644331905772 7eda4431c6e339fb479ef33, cn=Shivaji P Karwar
Date: 2019.03.05 11:20:03 +05'30'

(शि.पां.कारवार)
कक्ष अधिकारी,महसूल व वन विभाग

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १ व (२), लेखा परिक्षा,नागपूर
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १ व (२), लेखा व अनुज्ञेयता,नागपूर
३) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
४) उपआयुक्त, नागपूर (पुनर्वसन) नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
५) जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन संचालक, नागपूर/भंडारा
६) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
७) मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प , जलसंपदा विभाग, नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/भंडारा
९) कक्ष अधिकारी र-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई/ निवडनस्ती र-१ कार्यासन.